# मराठी भाषिक कौशल्ये विकास

संपादक | डॉ. पृथ्वीराज तौर

अथर्व
पब्लिकेशन्स

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
यांच्या अभ्यासक्रमास अनुसरून व अभ्यास मंडळाच्या मान्यतेने
पदवी तृतीय वर्षासाठी श्रेयांक (CBCS) पद्धतीनुसार मराठी कौशल्य विकास
अभ्यासक्रमास नेमण्यात आलेले पाठ्यपुस्तक (सत्र पाचवे व सहावे)

# मराठी भाषिक कौशल्ये विकास

संपादक
**डॉ. पृथ्वीराज तौर**

**अथर्व पब्लिकेशन्स**

अथर्व पब्लिकेशन्स

**मराठी भाषिक कौशल्ये विकास**

© सर्व हक्क
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ISBN 13 : 978-93-87129-77-1
पुस्तक प्रकाशन क्र. ५८६

**प्रकाशक**
युवराज भटू माळी
**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
**संपर्क:** ९४०५२०६२३०
**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. **संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाईट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १३ जुलै २०१८
**मुद्रितशोधन :** सुखदेव वाघ
**मुखपृष्ठ :** प्रशांत सोनवणे
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य : ₹ १७५/-**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत

''आपण विद्यार्थ्याहून श्रेष्ठ व निराळे आहोत किंवा आपले स्थान वरचे आहे ही जाणीव न ठेवता आपण त्यांचे एक स्नेही व सहकारी आहोत असे समजून एकरूप होण्याची, त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा शिक्षक मुलांना चांगले शिक्षण देऊ शकेल. मी स्वतःला पुढीलप्रमाणे प्रश्न विचारायला आरंभ केला. मी स्वतःवर जितके प्रेम करतो तितकेच विद्यार्थ्यांवर करू शकेन काय? मी स्वतःला जशी क्षमा करतो, तशी विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकीबद्दल क्षमा करू शकेन काय? त्यांच्या सुखदुःखात मी सहभागी होऊ शकेन काय? मुलांच्या जीवनातील सर्व अवस्थांत मी त्यांच्याशी पूर्णपणे एकरूप होऊ शकेन काय? मी हे करू शकेन, असे मला वाटले आणि समर्पणाच्या भावनेतून मी शिक्षकाचे काम स्वीकारले.''

**- स्वामी रामानंद तीर्थ**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**


- **प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख**
  अध्यक्ष तथा मराठी विभागप्रमुख, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
- **डॉ. पृथ्वीराज तौर**
  मराठी विभाग, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
- **डॉ. राजकुमार मस्के**
  मराठी विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जिल्हा – लातूर
- **डॉ. मार्तंड कुलकर्णी**
  मराठी विभाग, सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालय, किनवट, जिल्हा – नांदेड
- **डॉ. मथू सुरेश सावंत**
  मराठी विभाग, पिपल्स कॉलेज, नांदेड
- **डॉ. सा. द. सोनसळे**
  मराठी विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जिल्हा – परभणी
- **डॉ. पंढरीनाथ धोंडगे**
  मराठी विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी
- **डॉ. बी. बी. खंदारे**
  मराठी विभाग, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली
- **डॉ. जयद्रथ जाधव**
  मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जिल्हा लातूर
- **डॉ. विठ्ठल जंबाले**
  मराठी विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर, जिल्हा नांदेड
- **प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे**
  मराठी विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
- **डॉ. वंदना महाजन**
  संचालक, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे
- **डॉ सुनीता सांगोले**
  मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर
- **अरविंद जगताप**
  १ बी ४०२, न्यू दिंडोशी, म्हाडा कॉम्प्लेक्स, मालाड (पू.), मुंबई – ९७
- **फ. मुं. शिंदे**
  ८३, यमुना, महात्म गांधीनगर, पदमपुरा, औरंगाबाद – ५


# - भूमिका -

मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करण्याची दृष्टी बदलत चालली आहे. या बदलाची उत्तरे काळाच्या वेगात आणि वर्तमानाच्या बदलात सामावलेली आहेत. आता हेच पाहा की, रोज उठता बसता हवी तशी लवचिक मराठी आपण सर्रास वापरत असतो. मात्र मराठीचा विषय म्हणून अभ्यास करताना मराठीचे विद्यार्थ्यांना भय वाटत राहते. भय वाटण्यासारखे मराठीत काय आहे याचे उत्तर देण्याची जबाबदरी आपली आहे! म्हणजेच या लेखाच्या आरंभीच मी म्हटल्याप्रमाणे मराठीकरिता दृष्टीबदलत्या आणि वर्तमानबदलाचा विचार ऐरणीवर कधी तरी आणायला हवा. या बदलाचेच एक पाऊल म्हणून पदवी अंतिम वर्षाकरिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या 'मराठी अभ्यास मंडळा'ने नेमलेल्या ह्या क्रमिक पाठ्यग्रंथाकडे बघायला हवे. ह्या ग्रंथनिर्माणाचे सारे श्रेय मराठी अभ्यास मंडळाच्या धोरणात्मक, विकासात्मक दृष्टिकोनाला मी देईन.

विद्यापीठाची पदवी स्वीकारण्यापूर्वी पदवी अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांसाठी हा पाठ्यग्रंथ नेमलेला आहे.

अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की, मराठीमधील भाषिक कौशल्ये विकसित करू पाहणारी या ग्रंथाची धारणा आणि या ग्रंथाचा प्रधान हेतू विद्यार्थ्यांची ज्ञानलालसाही वाढविणारा आहे. म्हणजे असे की, हा महत्त्वाचा ग्रंथ केवळ शिकून सोडून देण्यासारखा नाही. तर त्यातील एकूण एक प्रकरण वाचून आणि अभ्यासून झाल्यानंतर त्यातून विद्यार्थ्यांना काहीएक प्रेरक मूल्ये घेण्याइतपत या ग्रंथात एक ऊर्जा नक्कीच सामावलेली वाचताना आढळून येईल. कारण आपापल्या क्षेत्रांतील खूप अनुभवी तसेच ज्ञानी लेखकांचे अभ्यास समृद्ध लेख या पाठ्यग्रंथात प्रविष्ट केलेले आहेत.

या पाठ्यग्रंथातील मजकुरांची अजून एक विशेषता अशी की, मजकुरांची कृती प्रवणता. वर्गात तुमचे सर हे सारे शिकवतील आणि महत्त्वाचे म्हणजे त्या दृष्टीने काही एक साक्षात सराव करून घेतील. प्रकल्परूपांत कार्य करून घेतील. म्हणजे दोनपदरी छान उपयोग या अभ्यासामधून लाभू शकेल. म्हणजेच ''अभ्यासातून झाले की ते करून पाहा'' असा वाचनानंदानंतरचा प्रात्यक्षिक आनंदही या पाठ्यग्रंथाच्या रचनेशी जोडला गेलेला आहे.

आमच्यासमोर संधी नाहीत असे नाही. संधी तर विपुल आहेत. समाज विस्तारा समवेतच संधी आणि सेवा यांचे मार्ग हे बहुस्तरीय वाढले आहेत. वाढतच जाऊ लागलेले आहेत. हे पण या पाठ्यग्रंथाची रचना करताना मराठी अभ्यास मंडळाने लक्षात घेतले आहे. अनेक स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी, प्रत्यक्ष कौशल्ये किंवा व्यवसाय असो की प्रशासन याकरिता कुशलता वर्धित करू पाहणारे घटक अथवा देहबोली आणि संभाषण कौशल्य, विविध कार्यक्रमांचे नेटके आयोजन करणे, त्याचे एकंदरीत रचना सौंदर्य आणि प्रभावसौंदर्य वाढविणे, परिणामकारक पण नेमके वृत्तांतलेखन, अहवाललेखन करणे, त्याची रोचकता, गुणवत्ता वाढविणे अशा एक नव्हे अनेक आणि अनेक गोष्टी आहेत. ज्या आपणास सुगम वाटतात पण त्या एवढ्या सहज नसतात. तिथे ढिसाळपणा चालत नाही. नेमकेपणा लागतो. औचित्य लागते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कौशल्य कामा येते. उत्कर्षाला

पाठराखण केली. मा. प्र. कुलगुरू डॉ.गणेशचंद्र शिंदे यांनी अभ्यासक्रम विषयक बैठकीत दिलेल्या सूचना हे सम्पादन करताना काटेकोरपणे अमलात आणण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यापीठाच्या कला विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शनाचा लाभ संपादक म्हणून मला झाला आहे. त्यांनी माझ्यावर व्यक्त केलेला विश्वास हे सम्पादन सार्थ करेल. या मान्यवरांप्रति मी कृतज्ञता व्यक्त करतो.

अनेकांच्या प्रयत्नांमुळे हे संपादन आकाराला आले आहे. विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयांत कार्यरत असणारे मराठीचे प्राध्यापक डॉ. हंसराज भोसले, डॉ.सुभाष कदम, डॉ. हनमंत भोपाळे, डॉ. दत्ता शिंदे, डॉ. सुरेश कदम, डॉ. कीर्तीकुमार मोरे, डॉ.संजय बालाघाटे यांच्याशी केलेली चर्चा यासाठी लाभदायी ठरली आहे. अथर्व पब्लिकेशन्सचे श्री.युवराज माळी, सौ. संगीता माळी यांनी अल्पावधीत आणि देखण्यारूपात हे संपादन विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले आहे. तसेच मुद्रितशोधनकार सुखदेव वाघ, मुखपृष्ठकार प्रशांत सोनवणे यांनीही अनमोल सहकार्य केले. संपादक म्हणून मराठी अभ्यास मंडळाचे सन्माननीय सदस्य प्रा. डॉ. राजकुमार मस्के, डॉ. जयद्रथ जाधव, डॉ. सा. द. सोनासळे, डॉ. पंढरीनाथ धोंडगे, डॉ. बाबूराव खंदारे, डॉ. मथुताई सावंत यांच्यासह सर्वांचे मी आभार मानतो. विद्यार्थी आणि प्राध्यापक या ग्रंथाचे स्वागत करतील ही अपेक्षा आहे.

**– डॉ. पृथ्वीराज तौर,**
मराठी विभाग,
भाषा, साहित्य आणि संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड – ४३१६०६.



## - अनुक्रमणिका -

**भूमिका** ........ **पाच**
– प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख

**मराठीतील नव्या संधी** ........ **सात**
– डॉ. पृथ्वीराज तौर

१. **मराठी भाषा कौशल्ये आणि व्यवसायाच्या संधी** ........ **१**
– डॉ. सुनीता सांगोले

२. **प्रसारमाध्यमातील संधी : पत्रकारिता** ........ **१७**
– किरण केंद्रे

३. **प्रसारमाध्यमातील संधी : आकाशवाणी** ........ **२०**
– उत्तम कोळगावकर

४. **प्रसारमाध्यमातील संधी : दूरचित्रवाणी** ........ **२९**
– दुर्गेश सोनार

५. **प्रसारमाध्यमातील संधी : चित्रपट** ........ **३५**
– अरविंद जगताप

६. **पटकथा लेखन** ........ **४१**
– डॉ. कविता मुरुमकर

७. **ब्लॉग लेखन** ........ **५०**
– डॉ. सचिन नरंगले

८. **वृत्तांत लेखन** ........................................................ ५७
   - प्रा. विद्या सुर्वे बोरसे

९. **अहवाल लेखन** ........................................................ ६६
   - डॉ. स्वाती दामोदरे

१०. **टिप्पणी लेखन** ........................................................ ७१
   - डॉ. स्वाती दामोदरे

११. **ग्रंथ प्रकाशन विश्व** ........................................................ ८२
   - डॉ. मार्तंड कुलकर्णी

१२. **ग्रंथपरीक्षण** ........................................................ १०३
   - डॉ. विठ्ठल जंबाले

१३. **कार्यक्रमांचे आयोजन** ........................................................ १२५
   - डॉ. निधी पटवर्धन

१४. **देहबोली आणि संभाषण कौशल्ये** ........................................................ १३५
   - अंजली धानोरकर

१५. **मुद्रितशोधन आणि प्रमाण मराठी लेखन** ........................................................ १५२
   - डॉ. पी. विठ्ठल

**लेखक परिचय** ........................................................ १६५



# मराठी भाषा कौशल्ये आणि व्यवसायाच्या संधी

- डॉ. सुनीता सांगोले -

**उद्दिष्टे**

- मराठी भाषिक क्षमता जाणून घेऊन त्यांचे व्यवहारातील विविधांगी उपयोजन लक्षात घ्यायचे आहे.
- मराठी भाषिक कौशल्यांचा विकास अभिप्रेत आहे.
- विविध भाषा कौशल्यांतून मिळणाऱ्या व्यवसायांच्या संधी जाणून घ्यायच्या आहेत.
- पटकथा, संकेतस्थळ कट्टा (ब्लॉग) लेखनाचे स्वरूप जाणून घेऊन ते लेखन कसे करावे हे शिकायचे आहे.

**प्रास्ताविक**

भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भाषेद्वारेच आपण बोलतो, रागावतो, प्रेम करतो, विनंती करतो, भाषण-संभाषणे करतो. उपयोगाची ही यादी आणखी खूप वाढवता येईल. जगाची ओळख माणसाला भाषेच्या माध्यमातून होत असते; आणि स्वत:ची ओळख सांगतानाही भाषेचेच माध्यम तो वापरतो. भाषा लवचिक आहे, परिवर्तनशील आहे, अभिव्यक्तीचे समर्थ माध्यम आहे. जीवनाच्या अनेक अंगांसाठी, व्यवहारासाठी आपण भाषेचा उपयोग करीत असतो. हे उपयोजन करीत असताना भाषाऔचित्य राखणे प्रभावी ठरते. व्यक्ती-व्यक्तीतील परस्परातील नाते, काळवेळ, प्रसंग, विषय संदर्भ यावरून भाषेची धाटणी ठरते. भाषा लवचिक असते. आपल्या गरजेनुरूप आपण तिला हवी तशी वळवतो म्हणजेच आकार देतो. जसे औपचारिक ठिकाणी होणारा भाषेचा वापर, कुटुंब, मित्र-परिवार अशा अनौपचारिक ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या भाषेत अंतर दिसून येते.

आज दैनंदिन व्यवहारातील भाषा वापर व्यापक आणि विविधांगी स्वरूपाचा दिसून येतो. भाषेच्या वापराचे क्षेत्र, भाषा वापरामागचे प्रयोजन, भाषा उपयोगात आणणारी व्यक्ती या दृष्टीने भाषा विकसित होणे गरजेचे आहे. भाषिक नैपुण्य आणि आकलन क्षमता यामुळे प्रकटीकरणाचा आत्मविश्वास बळकट होतो. भाषेच्या आत्मविश्वासपूर्ण प्रभावी वापरासाठी मूलभूत भाषिक कौशल्याची भक्कम पायाभरणी हवी.

# ग्रंथपरीक्षण

**- डॉ. विठ्ठल जंबाले -**

**प्रास्ताविक**

सृष्टीमध्ये सृजनाची प्रक्रिया मूलत: घडत असते. सजीव-निर्जीव कळत-नकळत नवनिर्मिती साधत असतात. सृष्टीतील एका घटकाची दुसऱ्या घटकाशी तुलना करण्याची आणि त्या परस्परांचे साम्य-भेद प्रकट करण्याची सहज पद्धती निर्माण झालेली असून त्याचेच द्योतक म्हणून साहित्याकडेसुद्धा पाहता येते. साहित्य निर्माण करणे आणि त्या साहित्याचे परीक्षण करणे या दोन्ही क्रिया पूर्वापार घडत आलेल्या आहेत. मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक, प्रवासवर्णन, चरित्र-आत्मचरित्र, ललितगद्य इत्यादी वाङ्मयप्रकार उदयास आले. त्यामधून विपुल प्रमाणात साहित्यनिर्मिती होऊन त्या लेखनाला ग्रंथसिद्धता लाभली. ते साहित्य मुद्रण, प्रकाशन आणि वितरण याद्वारे वाचकांपर्यंत पोहचले. वाचक, समीक्षक, अभ्यासक, आस्वादक यांनी त्या वाङ्मयाचे वाचन, अवलोकन, रसग्रहण, आकलन, मूल्यमापन आणि आविष्करण करण्यामधून ग्रंथपरीक्षणे केलेली आहेत. त्यामधूनच मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मितीसुद्धा झालेली दिसते. त्यांचा मराठी वाङ्मयाच्या उगम काळापासून मागोवा घेता येतो.

**'ग्रंथ' या शब्दाचा कोश वाङ्मयातील अर्थ**

'ग्रंथ' या शब्दाला शब्दकोशामध्ये १) मोठे पुस्तक, पोथी, जुळवणी, गुंफणी, जोडणी, संपादनी, २) पुस्तकाचा अध्याय, परिच्छेद, भाग, ३) योजना, बेत, कट, मसलत, ४) प्रसंग, गोष्ट, हकीगत, ५) विस्तार, लहानाची मोठी गोष्ट करणे, ६) अर्थसंगती ७) अकांडतांडव, कुभांड हे अर्थ दिलेले आढळतात.[१] तसेच पुस्तक या शब्दाचा पोथी, चोपडी[२] हा अर्थ दिलेला आहे. 'ग्रंथ' हा शब्द संस्कृतमधून मराठीत चालत आला आहे. हिंदीमध्ये 'किताब' तर इंग्रजीमध्ये 'Book' हे शब्द समानार्थाने वापरण्यात येतात.

**'परीक्षण' या शब्दाचा कोश वाङ्मयातील अर्थ**

परीक्षा या मूळ पदाचे परीक्षण हे शब्दरूप तयार झालेले असून दोन्हींच्या अर्थामध्ये बरेच साम्य दिसते. परीक्षण या शब्दासाठी परीक्षा, पारख, तपासणी, पर्यालोचन, गुण-दोषांची पाहणी हे अर्थ दिलेले आहेत. जर परीक्षण शब्दासाठी परीक्षा हा अर्थ कोशात दिलेला असेल तर शोध, तपास, प्रयोग, निरीक्षण,

निरखून पाहणे[३] या बाबी त्यात अंतर्भूत होतात. ग्रंथाची सिद्धता आणि त्याचे परीक्षण या दोन परस्पर संबंधित बाबी आहेत. म्हणूनच ग्रंथपरीक्षण हा पदबंध तयार झालेला आहे. त्यास अनुसरून ग्रंथपरीक्षण ही संकल्पना रूढ झालेली दिसते.

**ग्रंथपरीक्षण**

ग्रंथपरीक्षणास पुस्तक परीक्षण (इंग्रजीमध्ये Book Review) असेही म्हटले जाते. परंतु अभ्यासक्रमातील प्रकरणाचे शीर्षक ग्रंथपरीक्षण असल्यामुळे आपण सर्वत्र 'ग्रंथपरीक्षण' हाच शब्दप्रयोग वापरलेला आहे. म्हणून 'ग्रंथपरीक्षण' या सामासिक शब्दाचा संकल्पनात्मक अर्थ स्पष्ट करण्यासाठी उपरोक्त 'ग्रंथ' आणि 'परीक्षण' या शब्दाचे कोशगत अर्थ साहाय्यभूत ठरतात. ग्रंथाचे मोल ठरविणे, पारख करणे, तपासणी करणे, गुणदोषांची पाहणी करणे या प्रयोजनामधून ग्रंथपरीक्षण केले जाते. ते देश, काल परिस्थितीसापेक्ष विविधतेने लिहिले जाते.

**ग्रंथपरीक्षणाच्या वेगवेगळ्या भूमिका व प्रकार**

ग्रंथपरीक्षणे वाचून वाचक ती पुस्तके वाचण्यास प्रवृत्त होतो, असे नसले तरी सर्वच पुस्तके वाचकांच्या वाचनात येत नसल्यामुळे काही महत्त्वाच्या, वेगळ्या, लक्षणीय पुस्तकांकडे त्यांचे लक्ष वेधण्यास ग्रंथपरीक्षणे साहाय्यभूत ठरतात. चोखंदळपणे केलेले एखादे ग्रंथपरीक्षण वाचून ते पुस्तक वाचण्याची वाचकांच्या मनात जिज्ञासा निर्माण होऊ शकते. ग्रंथपरीक्षणे ही आजची गरज असली तरी ते प्रसिद्ध करण्याची प्रथा विविध ज्ञानविस्तार या मासिकाने एकोणिसाव्या शतकात सुरू केली. विषयाचे वेगळेपण, एखाद्या लक्षणीय पुस्तकातील वाङ्मयीन वैशिष्ट्ये, उपयुक्तता अशा अनेक हेतूंनी ग्रंथपरीक्षणे लिहिली. अलीकडे ग्रंथपरीक्षणे विविध पातळ्यांवरून केली जातात. वाङ्मयीन अभ्यास वा संशोधनाच्या भूमिकेतून वा वृत्तपत्राच्या साप्ताहिक पुरवण्यातून छापण्यासाठी, मासिके/त्रैमासिकांतून अथवा नियतकालिकांमधून, संशोधन पत्रिकांमधून, दिवाळी अंकांतून, समीक्षाग्रंथ प्रकाशनासाठी, एखाद्या पुस्तकाचे प्रस्तावना लेखन, पुस्तकांचे छंद म्हणून अथवा अभ्यासक्रमात समाविष्ट अभ्यास घटक इत्यादी हेतू अथवा भूमिकेतून ग्रंथव्यवहाराला अनुलक्षून ग्रंथपरीक्षणे लिहिली जातात. ग्रंथपरीक्षण म्हणजे नवप्रकाशित एखाद्या पुस्तकावरील ताजी प्रतिक्रिया होय. तसेच पूर्वी प्रसिद्ध झालेल्या एखाद्या ग्रंथाचे विशेष संस्करण झालेले अथवा नव्याने मांडणी करून ते प्रकाशित झाल्यामुळे, आवृत्तीमध्ये सुटलेला भाग नव्याने समाविष्ट करून सुधारित आवृत्ती प्रकाशित करताना किंवा बऱ्याच कालावधीनंतर आवृत्ती काढण्याच्या निमित्ताने पुस्तक परीक्षणे लिहिली जातात. त्याद्वारे एखाद्या साहित्यकृतीचा विस्तृत परामर्श घेतला जातो. जाणते अभ्यासक समोर ठेवून



समीक्षण मांडलेले असते. ते समजण्यासाठी अभ्यासाची व पूर्वतयारीची गरज असते. फार विस्तृत समीक्षण आणि चिकित्सा यापेक्षा पुस्तकाचा परिचय संक्षिप्तपणे स्वरूपात गुणदोषांसह विवेचन करून साहित्यकृतीचे मूल्यमापन करणे अपेक्षित असते. कारण पृष्ठसंख्येची, शब्दसंख्येची मर्यादा असते आणि वाचकांची अभिरुची आणि साहित्यविषयक जाणीव संस्कारित करणे हा लेखनामागील हेतू असतो.

नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध होणारी परीक्षणे वाचकांची अभिरुची वाढविण्यास मदत करतात. मराठी वाङ्मयापुरता विचार करताना सत्यकथा, आलोचना, अनुष्टुभ, युगवाणी, अस्मितादर्श, संशोधन पत्रिका या नियतकालिकांमधून ग्रंथपरीक्षणे आलेली दिसतात. सद्यःस्थितीत प्रतिष्ठान, अक्षरगाथा, अक्षरवाङ्मय, पंचधारा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका व इतर अनेक नियतकालिकांमधून परीक्षणे आलेली आढळतात. तसेच वृत्तपत्रांच्या साप्ताहिक पुरवण्यांमधून प्रकाशित होणारी परीक्षणे मजकुरासाठी असलेल्या जागेमुळे आटोपशीर व सर्वसामान्य वाचकांना नव्याने प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाबद्दल कुतूहल वाढविण्यासाठी उपयुक्त ठरतात. तेव्हा संबंधित पुस्तकातील विषय, वाङ्मयीन विशेष, लेखकाची भूमिका आणि यशापयश यांची मर्यादित शब्दात माहिती द्यावी लागते. वृत्तपत्रे इतर माध्यमांपेक्षा वेगाने आणि अधिक प्रमाणात पोचतात, म्हणून नवनवीन पुस्तकांची तोंडओळख दिलेली असते. वृत्तपत्रातील जागेवर परीक्षणाचे स्वरूप निश्चित करणे योग्य असते. या प्रकरणात आपणास ग्रंथपरीक्षण कसे करावे? त्याचे नेमके स्वरूप कसे असते? ग्रंथपरीक्षणांचे महत्त्वाचे टप्पे कोणते? या कार्यातून विद्यार्थ्यांचे कोणते कौशल्य विकसित होते? या बाबींचा मागोवा घेणे या प्रकरणात अपेक्षित आहे.

**प्रकरणाच्या अभ्यासाची उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याशी संबंधित कौशल्यांचा विकास व्हावा.
२) बहुश्रुतता वाढावी, भाषाकोश समृद्ध व्हावा. कल्पनाशक्तीचा विकास घडावा.
३) लेखन कौशल्य विकासाला चालना मिळावी.
४) विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयविषयक आवड निर्माण करणे.
५) विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक परीक्षणासंबंधीचा दृष्टिकोन विकसित करणे.
६) लेखक आणि त्यांच्या साहित्यकृतींचा परिचय वाढविणे.
७) आस्वाद संकल्पना व स्वरूप समजावे. तसेच ग्रंथपरीक्षणात साहित्यकृतीच्या आस्वादाचे महत्त्व लक्षात यावे.
८) एखाद्या साहित्यकृतीचे आकलन ग्रंथपरीक्षणासाठी किती उपयुक्त आहे, याची विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करावी.

९) साहित्यकृतीच्या मूल्यमापनाचे निकष कळावेत. विद्यार्थ्यांना समीक्षण लेखनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा.

१०) आस्वाद-आकलन-मूल्यमापन या समीक्षण लेखनातील मूलभूत टप्प्यांची माहिती मिळावी.

**ग्रंथपरीक्षणातील घटक**

ग्रंथपरीक्षणासाठी आस्वाद-आकलन-मूल्यमापन या घटकांची क्रमशः माहिती घेऊ या.

**• आस्वाद**

आस्वाद, आस्वादन (रसग्रहण), आस्वादक (रसिक), आस्वाद प्रक्रिया या संकल्पना ग्रंथपरीक्षणाशी निगडित आहेत. आस्वाद हा शब्द रस किंवा चर्वण या शब्दाप्रमाणे पाकशास्त्रामधूनच साहित्यशास्त्रात रूढ झालेला आहे. भरतमुनींनी तो सर्वप्रथम आपल्या नाट्यशास्त्रात वापरलेला आहे. (उदा. आस्वादयन्ति सुमनसः प्रेक्षकाः). शब्दकोश वाङ्मयात 'आस्वाद' या शब्दाचा अर्थ : (१) रुची, चव, स्वाद, (२) लालसा, इच्छा इत्यादी.[४] तसेच आस्वादन म्हणजे सेवन, स्वाद घेणे. तसेच समीक्षाशास्त्रात एखाद्या वस्तूचा केवळ उपभोग घेणे म्हणजे आस्वाद घेणे नव्हे, तर आस्वाद हे नेमकेपणाने केलेले रसग्रहण होय. आस्वाद घेणे आणि रसग्रहण करणे म्हणजे साहित्यकृतीतील मर्माचा शोध घेणे. म्हणजे साहित्यकृतीतील नेमक्या सौंदर्याचा सहानुभूतीपूर्वक घेतलेला शोध आणि त्याद्वारे नेमकेपणाने केलेले मूल्यमापन आस्वाद वा रसग्रहणात समाविष्ट होते.

साहित्यकृतीतील सौंदर्य अंतरंग आणि बहिरंग या दोन्हीतून प्रकट होत असते. म्हणून आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंचे सौंदर्य अनुभवणे महत्वाचे असते. त्याकरिता आवश्यक कौशल्याची दखल आस्वादक्रियेत घ्यावी लागते. ही दखल सहृदयतेने व सहानुभूतीपूर्वक घ्यावी लागते. याबाबत गो.म. कुलकर्णी यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, 'कलाकृतीतील मांडणीची पद्धती बघणे, रचनेचे कौशल्य पाहणे, तिची लयांगे न्याहाळणे, गुंतागुंत नजरेत घेणे, कलाकृतीचे विश्लेषण, संश्लेषण करणे या साऱ्या क्रियांचा संबंध रसग्रहणाशीच आहे.'[५] 'रसग्रहण' ही सौंदर्यशास्त्राची एक शाखा आहे. कलावंत व रसिक दोहोंच्याही भूमिकेचा विचार सौंदर्यशास्त्र करते, परंतु रसग्रहणामध्ये रसिकाने उत्तम आस्वाद कसा घ्यावा याचाच प्राधान्याने विचार केलेला असतो. यावरून साहित्य हे अनेक प्रकारचे असते, साहित्य अभ्यासाकडे वाचकांची दृष्टी भिन्न असते. भिन्न-भिन्न भूमिकांतून रसिक साहित्याकडे वळतो हे लक्षात घ्यावे लागते.

एखाद्या साहित्यकृतीचे डोळसपणे केलेले वाचन आस्वादात समाविष्ट करता येते. साहित्यशास्त्रात नुसता वाचक आणि रसिक हे भिन्न समजण्यात येतात.



प्रत्येक वाचक हा रसिक असतोच असे नाही. रसिकतेशिवाय आस्वाद घेता येत नाही. रसिकांच्या भिन्नत्वाचे वर्णन प्रा.द.के. केळकर यांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे. ते लिहितात, कधी त्याने (रसिकाने) ग्रंथविवरण करणाऱ्या पंतोजीचे रूप घ्यावे, तर कधी भलेबुरे शेरे मारणाऱ्या दिपोटीची ऐट आणावी, कधी जनमनात न भरलेल्या ग्रंथातील गुणोत्कर्षाचे उज्ज्वल वर्णन करून रसिकांचा अनुनय करणाऱ्या वकिलाची भूमिका घ्यावी, तर कधी न्यायासनावर बसून निःपक्षपातीपणे गुणदोष चर्चा करणाऱ्या न्यायाधीशाचा पेशा स्वीकारावा, कधी गणमात्रा मोजणाऱ्या गणित्याची नीरस मुद्रा धारण करावी, तर कधी काव्यातील रम्य स्थलांचे तितक्याच रम्य भाषेत वर्णन करणाऱ्या रसिकाची उल्हासित वृत्ती स्वीकारावी, कधी अप्रसिद्ध कवींना जुन्या धूळ खात पडलेल्या बाडातून व कसरीच्या तडाख्यातून सोडवून रसिकांची भेट करविणारा संशोधक बनावे, तर कधी काव्याचे मंथन करून त्यातील नवनीत काढणारा तत्त्वज्ञ म्हणून मिरवावे.'[६] वरील वर्णनावरून आस्वादकांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी कोणतीही असो, फलिताचे स्वरूप कोणतेही असो, पण आस्वादनाची क्रिया मात्र एकच होत असते. साहित्यकृतीतील मर्माचे-सौंदर्याचे, रसाचे ग्रहण केले जाते. लेखक, साहित्यकृती आणि रसिक हा त्रिकोण कल्पिला जातो. यामध्ये आस्वादक्रियेत रसिक किंवा आस्वादक या तिसऱ्या कोनाला महत्त्व आहे. रसिकाकडून आस्वादनाची क्रिया घडते. यासाठी त्याच्याकडे रसिकता, सौंदर्यग्रहणक्षमता संवेदनक्षमता या शक्ती आधारभूत असतात.

**आस्वादकाचे गुण** – कलाकृतीचा आस्वाद घेण्यासाठी खालील गुण आवश्यक आहेत.

आस्वादासाठी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य आवश्यक असते. गो.म. कुलकर्णी यांनी 'रससेवनाला एकप्रकारच्या स्थैर्याची व मानसिक स्वास्थ्याची गरज असते' असे म्हटले आहे. ते यथार्थ वाटते.[७] आस्वादकाला काव्यस्वरूप शास्त्राची जाण असावी.

प्रभाकर पाध्ये म्हणतात त्याप्रमाणे 'आस्वादासाठी आस्वाद घेणारी स्वरसंजनात्मक दृष्टी म्हणजे सौंदर्यदृष्टी आवश्यक असते. म्हणजेच प्रत्येक गोष्टीकडे तिच्या तिच्या जातीच्या दृष्टीने पाहणे आवश्यक असते.' सौंदर्यदृष्टीला आस्वादसमयी कोवळीक प्राप्त होणे गरजेचे असते.

अंतर्मुखता, कृतिशून्यता हे गुण रसिकांच्या ठिकाणी असावे लागतात. साहित्यकृतीतील आशय व अभिव्यक्तीचे कुतूहल मनाला एकाग्र करते व त्यातील कृतीद्वारा जिज्ञासेपोटी अनुभवविश्वाची संगती लावली जाते. याकरिता रसिकांकडे जिज्ञासा असावी.

आस्वादनासाठी साहित्यकृतीचे यथायोग्य प्रतिबिंब रसिकमनावर उमटणे आवश्यक आहे. मन जर पूर्वग्रहदूषित असेल तर प्रतिबिंब गढूळ होण्याचा संभव आहे. करिता रसिकांच्या ठिकाणी मनाची निर्मलता असणे आवश्यक ठरते.

**आपुलकी व सहानुभाव** – 'आस्वाद प्रक्रिया म्हणजे एक हृदयसंवाद'[८] असे गो.म. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. त्याचप्रमाणे साहित्यकृतीचा मथितार्थ समजून घेताना जीवनविषयक दृष्टिकोन बाजूला ठेवून रसिकमनात साहित्यकृती व लेखकांबद्दल आपुलकी व सहानुभूती असणे आवश्यक आहे. लेखकाला व साहित्यकृतीला योग्य न्याय देण्याची भूमिका असावी.

आस्वादकाजवळ साहित्यकृती व लेखक यांच्याशी तद्रूप होण्याची क्षमता असणे अनिवार्य आहे. साहित्यप्रकार, जीवनव्यवहार, अनेकविध संदर्भ यांचे ज्ञान रसिकाला असणे आवश्यक आहे. स्वत:ला विसरण्याची क्षमता हवी. रसिक हा सहृदय प्रतिभावंत असावा. प्रतिभेशिवाय आस्वाद घेणे अशक्य आहे. 'लेखक बोलका रसिक असतो आणि रसिक हा मुका लेखक असतो.'[९] या गो.म. कुलकर्णी यांच्या मतांमधून रसिक व लेखक यांच्यातील साधर्म्य आढळते. आस्वादकाकडे आस्वादासाठी उपरोल्लेखित गुण आवश्यक आहेत.

• **आकलन**

आपण सुरुवातीला आकलन या संकल्पनेचा शब्दकोशातील अर्थ लक्षात घेऊ. आकलन शब्दाचे शब्दकोशातील अर्थ पुढीलप्रमाणे आहेत. (१) बंधन, ताबा, वर्चस्व, (२) समावेश, आत घेणे, (३) बोध, समज, ग्रहणशक्तीने मिळविलेले ज्ञान.[१०] यावरून आकलन म्हणजे बोध, समज, ग्रहणशक्तीने मिळविलेले ज्ञान हेच पुस्तक परीक्षणामध्ये केंद्रवर्ती समजण्यात यावे. अनावश्यक घटकांकडे दुर्लक्ष करून हव्या त्याच (वेचक) गोष्टी लक्षात ठेवणे/समजणे यास पुस्तक परीक्षण करताना आकलन असे संबोधता येईल. वाचनात अधिक महत्त्व आकलनाला आहे. वाचन प्रक्रियेतील विविध घटकांकडे लक्ष दिल्यास आकलन चांगले होते.

**आकलन चांगले होते म्हणजे नेमके काय?**

१) मजकुरातील मध्यवर्ती कल्पना कळते. महत्त्वाचा तपशील समजतो. यालाच बोधन पातळी असे संबोधतात.

२) योग्य तो तर्क/अंदाज बांधता येतो.

३) योग्य-अयोग्य, उचित-अनुचित, आवश्यक-अनावश्यक काय, ते ठरविता येते.

४) नेमके/आवडीचे तेवढे लक्षात राहते.

या आकलनाच्या चार पातळ्या आहेत.

लेखकाला जे सांगावयाचे आहे ते योग्य/उचित अर्थासहित कळणे यासाठी प्रथमता मजकुराची चाळणी करावी लागते. पुस्तकाचे मुखपृष्ठ, शीर्षक, अनुक्रमणिका, मांडणी, भाषा, परिशिष्ट, सूची, समारोप, मलपृष्ठ इत्यादी पाहून मजकुराची उपयुक्तता ठरविली जाते. निवडलेल्या मजकुरातील महत्त्वाचे शब्द, मध्यवर्ती विषय लक्षात राहावा म्हणून अधोरेखन करावे. वाचत असताना थोड्या वेळात महत्त्वाचे व गाभ्याचे लक्षात येणे म्हणजे सारग्रहण होय. लेखकाच्या शैलीचा फुलोरा, स्पष्टीकरणार्थ दिलेली उदाहरणे हे वगळता मूळ आशय लक्षात घेणे म्हणजे सारग्रहण. आकलनामध्ये वाच्यार्थासोबतच लक्ष्यार्थ किंवा सूचितार्थाला - व्यंग्यार्थाला महत्त्व असते. शब्दांमध्ये, वाक्यांमध्ये दडलेला गर्भित अर्थ समजणे आवश्यक असते. कधी-कधी अर्थ समजण्यासाठी काही तर्क किंवा अनुमान करावे लागतात. परिच्छेदातील/वाक्यातील माहितीवरून पुढचे-मागचे संदर्भ अनुमानाच्या आधारे जाणावे लागतात. हा सौंदर्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास (Fantestic study of literature) ठरतो. केवळ सुंदर वस्तू म्हणून अभ्यास केला पाहिजे ही कलावादी भूमिका. त्या भूमिकेस अनुलक्षून सौंदर्याचे आकलन व सौंदर्याचे मूल्यमापन करता येते.

सौंदर्याचे आकलन या दृष्टिकोनातून केलेला अभ्यास हा समीक्षेचा गाभा आहे. बोधात्मक समीक्षेला मूल्यमापनाची गरज आहे. स्वरूपाचा शोध, समाजाशी, इतिहासाशी, तत्त्वज्ञानाशी असलेले नाते तपासणे, अभिप्राय, परीक्षण, आस्वाद व स्वरूपशोध यावरच आधारित वाङ्मयकृतीमधील सौंदर्याचे आकलन-मूल्यमापन करण्यात येते. वाचणारा वाचत असताना स्वत:च्या दृष्टीने उपयुक्त काय, अनुपयुक्त काय, योग्य-अयोग्य काय त्याची निवड करतो. मूल्यमापनाचे दंडक वाचणाऱ्याजवळ असतात. वाचकांच्या पूर्वानुभव-प्रभावावरून अपेक्षेप्रमाणे मूल्यमापन, निकष लावून वाचले जाते. अशा वेळी मूल्यमापनात्मक आकलन घडते.

एखादे पुस्तक वाचून किंवा उतारा वाचून वाचक लेखकांच्या भूमिकांशी समरस होऊन त्याबद्दल प्रतिक्रिया देतो. लेखकांच्या भावनांची-संवेदनांची जाणीव अनुभवणे यालाच रसग्रहणात्मक आकलन पातळी असे म्हटले जाते. लेखकाची भूमिका, त्यांनी रेखाटलेल्या पात्रचित्रणे, पात्रांच्या भाव-भावना, स्वभाव, लेखकांची शैली, शब्दसौंदर्य, लेखनसौंदर्य यामध्ये वाचक रममाण होतो. त्यांच्या पंचज्ञानेंद्रियांची संवेदना रसग्रहणात्मक आकलनातून अभिव्यक्त होते.

साहित्याची निर्मिती करणारा तो लेखक, असे वाङ्मयीन परिभाषेत संबोधण्यात येते. लेखकाने निर्माण केलेली लेखनकृती पुस्तक रूप धारण करते. ते प्रकाशक-वितरकांच्या अथवा अन्य मार्गांनी वाचकांपर्यंत पोहचते. वाचकांच्या आकलन-आस्वादनामधून त्या लेखनकृतीचे मूल्य ठरविण्यासाठी अभिप्राय

कळविले जातात. ते वाचक सापेक्ष असू शकतात. परंतु ते साधक-बाधक पद्धतीने सखोल चिंतनगर्भ गुण-दोषांसह प्रकट केलेले असतील तर साहित्यकृतीचे मोल ठरविण्यासाठी उपयुक्त ठरतात. लेखनकृतीचे मोल ठरत असताना त्यातील वास्तव आणि कल्पित यांचा शोध वाचक घेतात. तसेच वाङ्मयीन निकष तपासण्यासाठी साहित्यकृतीतील संदर्भ तपासावे लागतात.

- **मूल्यमापन**

ग्रंथपरीक्षणात साहित्यकृतीचे मोल ठरविणे, वाङ्मयीन मूल्य निश्चित करणे, मूल्यमापनाच्या कसोट्या व निकष वापरणे अंतर्भूत असते. म्हणून सुरुवातीला मूल्य, माप, मापन आणि मूल्यमापन या शब्दांचा शब्दकोशातील अर्थ लक्षात घेऊ. मूल्य म्हणजे किंमत, मोल.[११] तसेच माप या शब्दाचे खालील अर्थ आढळतात. (१) प्रमाणाने मोजून निश्चित करण्याचे साधन, वजन, साठा, लांबी इत्यादीची मोजण्याची, गुणण्याची क्रिया, (२) गणना, गणणेने निश्चित करणे, (३) मापण्याने निश्चित केलेले मान, परिमाण, मापण्याचे साधन, (४) मापलेला, परिमित भाग. माप या शब्दापासूनच मापन हा शब्द रूढ झाला आहे. त्याचे मापणे, मोजणे, माप घेणे असे अर्थ दिसतात.[१२] यावरून मूल्यमापन म्हणजे विशिष्ट मोजपट्टीने साहित्याचे मोल मोजणे, किंमत मोजणे होय.

एखादी साहित्यकृती चांगली आहे की वाईट आहे, त्याचप्रमाणे ती चांगली अथवा वाईट का आहे याचा विचार मूल्यमापनाच्या कक्षेत येतो. अन्य साहित्यकृतीशी तुलना हाही मूल्यमापनाचा भाग असतो. उदा. एखादी कादंबरी ही कादंबरी आहे किंवा नाही, वास्तवाचे चित्रण तिच्यात कसे झाले आहे, शब्दांची निवड, वाक्यांची जडणघडण, प्रतिमा-प्रतीकांचा अवलंब तिच्या आशयाशी पोषक आहे की, विघातक आहे. इत्यादी प्रश्नांचा विचार मूल्यमापनाशी निगडित असतो. कलाकृती ही एक स्वायत्त, स्वयंपूर्ण वस्तू मानून जसा तिचा विचार होऊ शकतो, तसाच सामाजिक वास्तवाच्या विशाल चौकटीत तिचे आकलन व मूल्यमापन केले जाऊ शकते. साहित्यकृती ही एक कलाकृती म्हणून स्वयमेव आहे की सामाजिक विधी की सांस्कृतिक दुवा - म्हणजे साहित्यकृतीचे मूल्यमापनाचे प्रयोजन काय आहे हे लक्षात घेऊनही मूल्यमापन शक्य असते. साहित्यकृतीला केवळ सौंदर्यमूल्य लक्षात घेऊन किंवा सौंदर्येतर मूल्यांना महत्त्व देऊनही मूल्यमापन केले जाते. मूल्यमापन हे साहित्यकृतीच्या स्वरूपाशी, लेखकाच्या निर्मिती प्रक्रियेशी, वाचकांच्या आस्वादक्रियेशी अथवा साहित्यकृती व समाज यांच्यातील परस्परसंबंधांशी निगडित असते. कोणत्याही साहित्यकृतीला एक सौंदर्यमूल्यांचा/कलामूल्यांचा आणि दुसरा सौंदर्येतर मूल्यांचा/जीवनमूल्यांचा असे दोन स्तर असतात. सौंदर्यमूल्यांचे फलित सौंदर्यभावना, रसप्रतीती, आनंद



हे असते. सौंदर्येतर मूल्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक अशा अनेक व्यवस्था प्रतिमांकित करतात. सौंदर्यमूल्ये आणि सौंदर्येतर मूल्ये यांचा समन्वय एखाद्या साहित्यकृतीत नीट साधला आहे किंवा नाही हा विचारही मूल्यमापनात केला जातो.[१३] वाङ्मयाची ज्ञानप्राप्ती हे समीक्षेचे अंतिम उद्दिष्ट आहे. पण जीवनवादी केवळ सुंदर वस्तू म्हणून अभ्यास पुरेसा नाही, असे म्हणतात. जिथे मूल्यमापनावर भर असतो तिथे निर्णायक टीका असते. वाङ्मयाबद्दल आपल्याला एक भूमिका घ्यावीच लागते, तरच स्वरूप शोध शक्य आहे. त्यातूनच मूल्यमापन करणे शक्य आहे. भौतिकशास्त्राप्रमाणे मराठी साहित्याचे मूल्यमापन त्रिकालाबाधित अंतिम सत्य असत नाही. पण ते निश्चितच सत्याच्या जवळ जाणारे असते.

साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना साहित्यकृतीचा विषय, आशय, रचना, मांडणीचे सूत्र, वाङ्मयीन विशेष, सामाजिक संदर्भ, प्रादेशिकतेचे प्रतिबिंब आणि राष्ट्रीयतेची भावना व एकंदरीत उपयुक्तता या बाबींचा गुणदोषांसह ऊहापोह केला जातो. वाङ्मय अभ्यासात स्वरूप ठरविणे याला विशेष महत्त्व असते. पुस्तक परीक्षण हे भाषाविषयात वाङ्मय अभ्यासच ठरते. ते स्वरूप निश्चित करताना मूल्यमापन करणे अपेक्षितच. एक प्रकारे ते समीक्षण व ते कार्य समीक्षकाचे असते. त्याला समीक्षा पद्धतीत फारसे महत्त्व नाही. जिथे जिथे लालित्य प्रकट होते, तिथे-तिथे समीक्षकांना-अभ्यासकांना अभ्यास करावयाचा असतो. त्याची लालित्य ही सीमा आहे. समीक्षा हे एक शास्त्र मानले तर त्याच्या कक्षेत लेखन करणे समीक्षकाचे कार्य आहे.

ग्रंथपरीक्षणामधून वाचन कौशल्य आणि लेखन कौशल्य यांचे विकसन घडावे. याकरिता वाचन कौशल्य आणि लेखन कौशल्य यांचे स्वरूप समजून घेणे महत्त्वाचे आहे. वाचन, लेखन व कौशल्य या तीन शब्दांचा शब्दकोशातील अर्थ खालीलप्रमाणे आढळतो. लेखन-ण म्हणजे (१) लिहिणे, (२) लिहिण्याची धाटणी, शैली, (३) जे लिहिले ते[१४] वाचन म्हणजे पठणक्रिया, वाचण्याची क्रिया, अभ्यास, पठण[१५] आणि कौशल-ल्य या शब्दाचा अर्थ (१) कुशलता, चातुर्य, (२) सुख, कल्याण, सुरक्षितता.[१६] वरील शब्दकोशगत संदर्भाआधारे वाचन कौशल्य या पदबंधाच्या अर्थाची उकल करताना वाचन क्रियेची कुशलता किंवा चातुर्य असा अर्थ घ्यावा लागतो. तसेच लेखन कौशल्य या पदबंधाच्या अर्थाची उकल करताना लिहिण्याची धाटणी, कुशलता, लिहिण्याचे चातुर्य असा बोध घ्यावा लागतो.

**वाचन कौशल्य**

वाचन कौशल्य हे एक महत्त्वाचे कौशल्य असून त्यावरच संपूर्ण ग्रंथ परीक्षण अवलंबून आहे. वाचनाशिवाय साहित्यकृतीचे परीक्षण करता येत नाही. वाचत असताना लिहिलेले डोळ्यांनी पाहून ओळखणे एवढेच अभिप्रेत नसते. मजकुराचा

अर्थ कळणे महत्त्वाचे असते. मजकुराचा अर्थ कळणे यात बऱ्याच गोष्टी येतात. लेखी शब्द हे दर वेळेला बोलणे शक्य नसल्यामुळे आलेले असतात. यामुळे वाचनात अक्षरज्ञान, अक्षर व आवाज यातील परस्परसंबंध, वाचणाऱ्याचा भाषिक हेतू इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**वाचनाचे प्रकार** – आपण वाचत असतो, कधी मोठ्याने, कधी मनात, कधी सहज दुकानांच्या पाट्या, जाहिराती, तर कधी गरज नसतानाही वाचतो. अशा वाचनाचे वाचकाच्या हेतुनुसार प्रकार पाडता येतात. यामध्ये वाचनाचा पहिला प्रकार म्हणजे प्रकट वाचन. प्रकट वाचन म्हणजे लेखकाने लिहिलेले विचार, कल्पना, भावना योग्य त्या विरामचिन्हांसह, योग्य ठिकाणी आघात देत, स्वरांच्या चढउतारासह शुद्ध उच्चार करीत श्रोत्यांपर्यंत पोहचविणे. या वाचन कौशल्याचा वापर नट, वक्ता, वकील, दुभाषी, वृत्तनिवेदक, संदेशवाहक, पत्रवाचक इत्यादी अनेक व्यावसायिक करतात. मूक वाचन हा वाचनाचा दुसरा प्रकार. मूक वाचन म्हणजे वाचकाने मनातल्या मनात अर्थग्रहणासाठी, आकलनासाठी, आनंदासाठी केलेले जलद वाचन होय. यात उच्चारणासाठी, ओठांच्या हालचालीसाठी लागणारा वेळ व शक्ती खर्च होत नाही.

अभ्यासक, संशोधक, शिक्षक, लेखक, सामान्य वाचक अशा ज्यांना खूप वाचायचे असते त्यांना मूक वाचन उपयुक्त आहे. तसेच वाचनाचा तिसरा प्रकार म्हणून फावल्या वेळेतील वाचन याचा विचार करावा लागतो.

दैनंदिन व्यापात किमान एकदोन तास मोकळे मिळत असतात. त्यास फावला वेळ असे म्हणतात. अशा फावल्या वेळेत मन रमविण्यासाठी वाचन केले जाते. त्यातून अनेक लेखक, त्यांच्या लेखनशैली, जीवनदृष्टी, शब्दयोजना यांची माहिती मिळते. अध्ययनप्रवण वाचन हा वाचनाचा चौथा प्रकार. एखाद्या बाबींचे/विषयाचे अध्ययन करणे, चिकित्सा/विश्लेषण करून माहिती मिळविणे म्हणजे अध्ययनप्रवण वाचन होय. यामध्ये वाचन, प्रश्ननिश्चिती, विचार, सर्वेक्षण, घटकांचे पुनर्वाचन, मनन इत्यादी घटक समाविष्ट होतात. वाचनातून घडणाऱ्या कृती सहजता प्रकट होत असतात. वाचन करीत असताना अर्थाचे आकलन, उद्दिष्टानुसार कृती/क्रिया/प्रतिक्रिया घडल्या पाहिजेत. लेखनामागील हेतू, भूमिका व संदर्भ समजतो. विशाल चौकटीत तिचे आकलन व मूल्यमापन केले जाऊ शकते. लिहिणाऱ्याची कळकळ, स्वभाव कळतो. भाव व्यक्त करताना शब्दांची अर्थगर्भितता समजते. लिहिणाऱ्यांच्या हेतुनुसार वाचणाऱ्याच्या तयारीप्रमाणे होणारे अर्थाचे आकलन परीक्षणामधून प्रतीत होते.

**वाचनाचे महत्त्व** – खूप आणि चिकित्सक वाचनाने अनुभवात भर पडते. विपुल माहिती संग्रही राहते. बहुश्रुतता प्राप्त होते. अध्ययन सखोल होते. स्वतःला आनंद मिळतो तसा दुसऱ्यालाही आनंद देता येतो. पुन्हा-पुन्हा केलेल्या वाचनाचे स्मरण होते. मत-विचार निश्चितीस मदत होते.

साहित्यकृतीच्या वाचनामधून साहित्यकृतीची विविध अंगे जाणवतात. गंगाधर पाटील यांनी साहित्यकृतीची सात अंगे सांगितली आहेत.

१) भाषिक अंग – साहित्यकृती शब्दांनी बनलेली असते. शब्दाचे ध्वनिरूप, अर्थरूप व वाक्यविन्यासात्मकरूप या भाषिक अंगांनी ती बनलेली असते.
२) आशयात्मक अंग – या भाषिक अंगातून तिचे आशयात्मक अंग प्रकट होत असते. हा आशय मानसिक आणि सामाजिक स्वरूपाचा येऊ शकेल.
३) रूपबंधात्मक व संरचनात्मक अंग
४) कल्पकतापूर्ण अंग
५) प्रकारात्मक अंग
६) सौंदर्यात्म/कलात्म अंग
७) अस्तित्वात्मक किंवा सत्ताशास्त्रीय अंग[१७]

या शिवाय चिन्हात्मक अंग, दृष्टिकोनात्मक अंग, देशकालात्मक अंग, मानसशास्त्रीय अंग, सांस्कृतिक अंग, संवादात्मक किंवा संज्ञापनात्मक अंग ही साहित्यकृतीच्या वाचनात विविध अंगे लक्षात घेतली पाहिजेत. साहित्यकृतीच्या वाचनात आस्वाद, आकलन आणि ज्ञान या तिन्ही बाबी अंतर्भूत असतात. वाचनप्रक्रियेतच साहित्यकृतीला अस्तित्व लाभते. प्रगल्भ वाचनामधूनच वाचक साहित्यकृतीच्या परीक्षण लेखनाकडे वळतो.

**लेखन कौशल्य**

लेखनात गती प्राप्त होणे, सुबक व सुबोध लेखन करणे, वाचन-आस्वाद-आकलन यामधून अवलोकन व अनुभवास आलेल्या बाबींचे नीटपणे आविष्करण होण्यासाठी लेखनातील कुशलता महत्त्वाची आहे. परंतु लेखन कौशल्य प्राप्त करण्यापूर्वी वाचन, आस्वाद आणि आकलन या पायऱ्या पूर्ण कराव्या लागतात. लेखनात आत्माविष्कार प्रभवीपणे इतरांपर्यंत पोहचविण्याचे सामर्थ्य असते. लेखन हे साधन आणि लेखनकौशल्य ही साधना. श्री शिवाजीराव भोसलेंच्या 'लेखन ही अक्षरक्रीडा आहे, ती आनंदाने करावी' या मतावरून लेखनाचे वेगळेपण प्रकट होते. ते योग्य दिशेने होण्यासाठी किमान तांत्रिक बाबींचा अवलंब विद्यार्थ्यांनी करावा. त्याखालीलप्रमाणे आहेत.

१) अक्षर फार मोठे अथवा फार लहानही नसावे.
२) अक्षरावर शिरोरेषा द्याव्यातच. त्याने अक्षरांचे व लेखनाचे सौंदर्य वाढते.

३) आपली अक्षरे सुवाच्य, सुंदर, योग्य वळणाने लिहिलेली असावी.

४) दोन अक्षरे, दोन शब्द, दोन ओळीत योग्य अंतर असावे.

५) लेखनात आवश्यक असणारी गती पाहिजेच, त्यात सातत्यसुद्धा असावे.

६) लेखनात आडव्या, उभ्या, तिरप्या रेषा काढण्याची दिशा महत्त्वाची असते.

७) वर्तुळ, अर्धवर्तुळ, वेलांट्या, सर्व वळणे काढण्याची दिशा महत्त्वाची असते.

**लेखनाचे टप्पे**

(१) हस्ताक्षर (२) शुद्धलेखन (ऱ्हस्व-दीर्घाचे नियम, विरामचिन्हे) (३) लेखन प्रकारानुसार स्वतःचे स्वतंत्र लेखन. या तीनही टप्प्यांना लेखन कौशल्यामध्ये सारखेच महत्त्व आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण करताना वरील लेखन कौशल्याचा अवलंब करावा. त्यामुळे पुस्तक परीक्षण लेखनामध्ये गती प्राप्त होते. लेखनकर्त्याचे भाषाविकसन घडते. अनुभवग्रहण ते अनुभवकथन असा लेखनप्रवास होतो. या दृष्टीने आपले विचार, भावना, मत, आपल्या भाषेत योग्यरीतीने लिहिता येण्यासाठी ग्रंथपरीक्षण लेखन उपयुक्त आहेच.

ग्रंथपरीक्षण करण्याअगोदर परीक्षणकर्त्याला काही पूर्वतयारीची गरज असते. परीक्ष्यग्रंथाची निवड करून त्याचे वाचन केले पाहिजे. (परीक्ष्यग्रंथ म्हणजे परीक्षणासाठी निवडलेला ग्रंथ) तसेच त्या संदर्भातील उपयुक्त अभ्यास परीक्षणाला सकसपणा प्राप्त करून देतो. उदा. परीक्ष्यग्रंथाच्या लेखकाचे पूर्वलेखन, त्या परीक्ष्यग्रंथपूर्व त्याविषयावरील लेखन, संबंधित ग्रंथावरील अन्य परीक्षणे, ग्रंथातील विषयाचे महत्त्व इ. परीक्षणकर्त्याने परीक्षणाच्या दृष्टीने परीक्ष्यग्रंथातील टिपणे काढावीत. वाचन व टिपणातून ग्रंथाविषयी अभिप्राय मनात तयार होत जातात. तेच अभिप्राय परीक्षणकर्त्याला शब्दांकन करताना उपयोगी ठरतात.

**ग्रंथपरीक्षणाचे स्वरूप**

पुस्तक परीक्षणाचा साचा निश्चित स्वरूपाचा नसला तरी साधारणपणे ग्रंथाच्या प्रकारानुसार, स्वरूपानुसार काही चौकट पाळली जाते. (उदा. माहितीपर, वैचारिक, ललित इ.) ग्रंथाचे स्वरूप आणि परीक्षणकर्त्याची भूमिका यावर परीक्षणाचे स्वरूप अवलंबून असते. तरीसुद्धा स्थूलपणे ते पुढीलप्रमाणे असते.

सुरुवातीला परीक्ष्यग्रंथांच्या लेखकाविषयी किंवा ग्रंथातील विषयासंबंधी ओळख करून देणारे प्रास्ताविक असावे. त्यानंतर परीक्ष्यग्रंथाचा लेखनकाल, प्रकाशक व शीर्षक यांचा परिचय करून द्यावा. ग्रंथातील विषयाची नोंद घेऊन ग्रंथगत आशयासंबंधी विस्तृत विवेचन करावे. त्याकरिता ग्रंथातील ठळक मुद्द्यांचा



निर्देश करावा. शक्य असेल तेथे संबंधित ग्रंथातील अवतरणे नोंदवावीत. परीक्ष्यग्रंथापूर्वीच्या ग्रंथांतर्गत विषयाशी तुलना करावी. त्या ग्रंथातील नावीन्यपूर्णता व पूर्वग्रंथापेक्षा वेगळीक दर्शवावी. सामान्यतः वाचकांना पुस्तकाचे स्वरूप समजून घेण्यामध्ये रस असतो. आवडलेल्या पुस्तकाचा परिचय करून देणे हा परीक्षणकर्त्याचा हेतू असतो. याकरिता समीक्षेच्या पातळीवर जाऊन पुस्तकाचा टीकात्मक परामर्श घेण्याची किंवा मूल्यमापन करण्याची त्याला गरज असतेच, असे नाही. ते असेल तर उत्तमच.[१८] या बाबींना अनुसरून वृत्तपत्रीय परीक्षणात परीक्ष्यग्रंथाचे संक्षिप्तपणे सार देणे गरजेचे असते. म्हणजेच पुस्तक परीक्षण ही पुस्तकाची एक झलक असते.

ग्रंथपरीक्षणाचे स्वरूप विशद करताना वि. शं. चौगुले यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. त्यांच्यामते, पुस्तक वाचकांकडे घेऊन जाणे, त्या पुस्तकाविषयी रसिक-वाचकांचे कुतूहल जागृत करणे, वाचकांच्या आस्वादक्षमतेत भर घालणे, जाता-जाता त्या पुस्तकाचे नेमके स्थान दिग्दर्शित करणे, लेखकाच्या शैलीचा परिचय करून देणे, हे परीक्षणकर्त्याचे काम असते. आपली स्वतःची वाङ्मयविषयक भूमिका न सोडता आपल्या परीक्षणाद्वारे समीक्षकाला वाचकांशी संवाद साधता आला पाहिजे. हा संवाद अधिक स्नेहशीलतेने परंतु तर्ककर्कश आणि कठोर न बनता साधणे यात परीक्षणकाराचे कौशल्य असते. (ग्रंथपरीक्षण : काही विचार, ग्रंथसंवाद-पृष्ठ- १५) यावरून ग्रंथातील आशयाचे सामर्थ्य, मांडणीचे सामर्थ्य, वाङ्मयीन सौंदर्य, लेखकाची शैली, ग्रंथाची एकूण गुणवत्ता आणि उपयुक्तता, सामग्र्याने लेखकांना लाभलेले यशापयश या बाबींचे विवेचन परीक्षणामधून नोंदविणे आवश्यक असते. तसेच पुस्तकाचे समतोल आणि निरपेक्ष मूल्यमापन करावे. त्यात 'केवळ शेरेबाजी असावी. परीक्षणाला अर्थपूर्ण शीर्षक दिल्यास उत्तमच.' ते वाचकांच्या उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरणारे असावे. पुस्तकातील आशयाचे मर्म, वैशिष्ट्ये वा वेगळेपण सुचविलेल्या शीर्षकातून निर्देशित करता यावे.

परीक्षणाची भाषा सामान्य वाचकास सहज समजेल, अशी सुलभ व सरळ अर्थ प्रकट करणारी असावी. सुबोध व स्पष्ट असावी. परंतु तिला विशिष्ट दर्जा असावाच. पारिभाषिक शब्द वा संज्ञा आवश्यक तेथे वापर कराव्यात. त्यांचा अतिरेक नसावा. (त्यांचे अर्थ नमूद करावेत) विद्वज्जड शब्दांमुळे परीक्षण क्लिष्ट बनते. परीक्षणाच्या शेवटी परीक्ष्यग्रंथाची माहिती देणे वाचकांच्या दृष्टीने उपयुक्त ठरते.

एकंदरीत पुस्तक परीक्षण अनुभव घेण्याची बाब आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांकडून किमान एका पुस्तकावर प्रत्यक्ष परीक्षण करून घ्यावे. यासाठी नमुने दाखल काही परीक्षणे देण्यात येत आहेत.

## ग्रंथपरीक्षणाचे नमुने

**(१) श्रीकांत देशमुख यांच्या 'बोलावे ते आम्ही' या कवितासंग्रहाचे डॉ. सतीश बडवे यांनी केलेले परीक्षण.**

### प्रगल्भ वैचारिक अवकाशावरील 'बोलावे ते आम्ही'

– डॉ. सतीश बडवे

मराठवाड्यातील कवितेविषयी बोलताना श्रीकांत देशमुख यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. मात्र मराठवाडा असा भूप्रदेशाचा उल्लेख केला तर त्यांची कविता विशिष्ट भूप्रदेशाशीच नाते सांगते असे होत नाही, मातीशी घट्ट नाते जोडणाऱ्या तुकोबांच्या अभंगकवितेशी असणारी त्यांची जवळीक हा एक महत्त्वाचा पाया मराठीतल्या तत्त्वशील व सकस काव्यलेखनाच्या परंपरेशी संधान बांधणारा आहे, हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. परंपरेतले सत्त्वशोधन करण्याची आंस आणि क्षणभंगुर मानल्या गेलेल्या जीवनाचे बहुआयामी चिंतन यांचा प्रकट आविष्कार करणारी कविता 'बोलावे ते आम्ही' मधून व्यक्त झाली आहे.

वस्तुत: देशमुख यांची भूमीनिष्ठा, कृषीसंबध्द चिंतन 'बळिवंत' आणि 'आषाढमाती' मधून यापूर्वीच आलेले आहे. तसे असेल तर या संग्रहात आणखी कोणत्या वेगळ्या जाणिवा प्रकटतात? हा शोध महत्त्वाचा ठरावा.

श्रीकांत देशमुख यांच्या कवितेतून एक सलग गोष्ट उभी राहते. भूमी सावरण्याची आणि नांगराच्या फाळाची ही गोष्ट आहे. पिचलेला, नागवल्या गेलेल्या, शोषणाला कायम बळी पडलेल्या आणि तरीही युगानुयुगे मातीशी नाळ जोडून ठेवणाऱ्या शेतकऱ्याची ही कहाणी आहे. ही युगांतराची कथा आहे. ओव्या गुंफत हाताच्या लयबध्द लयीतनं बायांचं निंदण, भुईच्या निऱ्यांमधनं अंकुरणं, हाडामांसाची माती होऊनही न सरणारं त्यांचं हे निंदण, काळाचा पदर पुढे पुढे जाणारा आणि हरळीकुंधा न मरण्याचं वास्तव या सगळ्यांनाच आकारबध्द करणारी ही गोष्ट आहे. त्यात झाडांनी सोसलेले दुष्काळ आहेत, नांगर देणारा काष्ठकार आहे, पहिला दाणा पेरणारा शेतकरी आहे, भाकरी भाजणाऱ्या अर्धनग्न बायका आहेत आणि मुख्य म्हणजे ही बैलाच्या आभाळभिड्या खांद्यांची, नांगर आणि माती खांद्यात रुजवून भूमी सावरण्याची गोष्ट आहे. शेतकऱ्याचे चराचर या कवितेत उभे राहते.

*चूलबोळकी/गाडगी मडकी/फुटकेतुटके रांजण / चंद्रचांदण्यातून उन्हाळ्यानंतरच्या / पहिल्या पावसाळी रात्रीसारखं / घनगर्द कवटाळेल आकाश दशदिशांना*



पण याच्याबरोबरच या चराचरात असतं मातीचं काळंसावळं सरोवर, भेगाभेगांची पाषाणपोकळी, अंधारातले गाईगुरांचे हंबरणे, भोवतालचा एकूणच काळोख, त्यात राबणारा, काबाडकाळ्या देहाचा हा शेतकरी... त्याची ही गोष्ट. माणसांनी स्वत:ची आब गमावली आहे. दु:खाचे भार, जखमा, वेदना आणि मातीचं गबाळ घेऊन त्याचं जगणं चालू आहे. या जगण्याविषयी बोलणारी ही कविता आहे. त्यांचा वंश वाढत जातो. हा वंश एका बाजूला कुटुंबाचा जसा आहे, तसाच तो वाट चुकत या शेतकऱ्याच्या घरात आलेल्या चंफी कुत्रीचाही आहे. चंफीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व इथे बहाल केलेले आहे. गर्भारपण बाईलाही असतं आणि चंफी कुत्रीलाही असतं. या साध्या पण अर्थपूर्ण घटनेत श्रीकांत देशमुख बोलतात ते असे–

*गर्भारपणी कुत्री काय न् बाई काय / असतात दोघीही सारख्याच*
*दोघींचाही जीव असतो बेंबीला टांगलेला*

कवीचे हे बोलणे चराचराकडे वळणारे आहे. जीवनसत्याचे दर्शन घडविणारे आहे. या सृष्टीशी असणारे शेतकऱ्याचे नाते त्याच्या बोलण्यामधून उलगडत जाते. एका अर्थी मौखिकतेच्या परंपरेला तो उजागर करीत जातो. भरदिवसाचा अंधार कुठे कुठे शोधावा? असा प्रश्नही त्याला पडतो. कारण या साऱ्याच्या मुळाशी असते एक निखळ सत्य जगण्यातले. या अंधाराची लय तो पकडतो.

*पोटातली भूक पचवून / कष्टणाऱ्यांच्या आतड्याच्या खोल तळाशी*
*अंधार देतो जगाला एक सार्वत्रिक लय / कुठल्याही इझमपलीकडची अनाकलनीय*

*ईश्वराच्या जांघेतील काळ्या सावलीसारखे / अंधारात / जग कसे खूप शांत वाटते.*

इझमपलीकडचा विचार करणारा हा कवी. त्याचे सारेच जगणे या भूमीशी बांधलेले. भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांची अप्रतिम सांधेजोड करीत आणि लोकगीताची लय सांभाळत शेतीशी जोडलेल्या स्त्रीची वेदनेने भरलेली कहाणी इथे साकार होते.

*भूमी उसवून भूमिगत होताना / एक बाई मी पाहिली आहे / कुणीतरी टाकून दिलेली*
*जंगलात जाताना / एक गर्भवती मी पाहिली आहे.*

भूमिगत होणाऱ्या स्त्रीविषयी बोलता बोलता 'सीताफळ बागेची गोष्ट' इथे साकारू लागते. सीतेचा वनवास, ती वनवासी शेती होणं यातून प्रकटणारी वेदना लक्षणीय पध्दतीने साकारते. सूक्ष्म निरीक्षणे आणि चिंतनाच्या पातळीवर

जाणारी बळीराजाची ही गोष्ट लोककहाणीमुळे अधिक गहिरी बनते. इथे प्रकट होते वेदनेचे अंत:सूत्र, भूमी, भूमीनिष्ठ असणाऱ्यांच्या व्यथांना मुठीत पकडण्याचं कवीचं कसब इथं पणाला लागतं.

शेतकऱ्याच्या जगण्याच्या गोष्टीतून इथे एक गाव उभे राहते. ते विशिष्ट नाव असणारे गाव नाही. जिथे जिथे शेतकरी आहे तिथले हे गाव आहे. कवीच्या अनुभवाचा पट इथे विस्तारताना दिसतो. हे गाव कर्जात बुडालेले गाव आहे. चिल्ल्यापिल्ल्यांना वाचवण्यासाठी घराला कुलूप लावून परागंदा होणाऱ्या गावाची ही गोष्ट आहे. नासलेल्या गावाची ही गोष्ट. इथले उदास वारकरी आणि भकास गावकरी देशमुखांच्या कवितेतून पुढे येतात. बापजाद्यांनी लावलेली झाडं जेसीबीच्या मदतीनं मुळापासून उखडली जातात. याच गावातली एक गढी. सध्या जमीनदोस्त झालेली. मीढीचे वारसदार आज कंगाल आहेत. तिच्या कहाण्या सांगणारे फक्त उरलेत.

*ओरिएन्ट गोल्ड, बिनानी, बिर्ला सुपर, अंबुजा, एसीसी / फिफ्टीथ्री ग्रेड सिमेंटच्या*
*विश्वव्यापी जमान्यात / एक परवडणारा पर्याय म्हणून / गढीच्या चिवट, वॉटरप्रूफ*
*मातीकडं/ आदिम चेहऱ्यानं पाहणारे लोक / आजही आहेत ह्यात पिढीजात गल्लोगल्ली*

याच गावात कधीकाळी लोकगीतं होती. लोककथा होत्या, ओव्या-तुंबडी-भलरीगीतं होती. आता या गीतांना मारणारे विषाणू चौफेर पसरत गेले आहेत. बोअर घेऊन घेऊन गावातल्या जमिनीची चाळणी झाली आहे. भुईच्या पोटातून बिनपाण्याचे निपुत्रिक पांढरे ढग निघतात. गावाची ही गोष्ट कवितेतून बोलण्यासाठी कवीचा आवाज काळजापासून फुटला आहे. गावाच्या तहानेची ही गोष्ट. इथून तिथून प्रत्येक गावात सारखीच. पाण्याविषयी बोलणारे, पाण्याचा शोध घेणारे, पाण्याचा व्यापार करणारे, पाण्याची तहान लागणारे भोवताली आहेत आणि तरीही 'तहान' शब्दाचा अर्थ कुणालाच का समजत नाही? हा प्रश्न आहे.

*तहान हा शब्द उच्चारू शकणाऱ्यांची संख्या / निदान आतातरी / भूतलावर वाढली पाहिजे / तहान हा शब्द आजवरतरी कोणाला / नीटपणे बोलता उच्चारता / वा / धारदार शस्त्र करता आलेला नाही.*

गावाच्या पिढीजात कोरड्या वेदनेची ही गोष्ट आहे. या गावावर जीव टाकणारे गावाबद्दल कधीच बोलत नाहीत, भोवतालाविषयी बोलत नाहीत.



मातीच्या दिशातून उगवणाऱ्या आणि मातीतच वाढणाऱ्यांच्या गावाविषयी कवी बोलत जातो. डोळ्यांच्या कोरड्या विहिरीवर पाणी भरणाऱ्या गुलाबराव आधार पाटलांची आणि त्यांच्या गावाचीही ही प्रातिनिधिक कहाणी आहे. गावाभोवती विषारी काळोख पसरवणाऱ्यांच्या दृष्टीने कुणी महादू दादू मरण्याची भाषा करतो तेव्हा मनोरुग्ण ठरतो. व्हिलेज खरोखर ग्लोबल झालं का? ग्लोबल व्हिलेज या शब्दाचा एक अर्थ 'बिनवेशीचं गाव' असाही आहे. गावशिवार आचके देण्याचं वास्तव व्यक्त करणारी ही गावपांढरीची कहाणी आहे.

आऊटडेटेड झालेल्या भूमिपुत्राची ही कहाणी जागतिकीकरणाच्या संदर्भात वेगळे रूप घेऊन येते. पिढीच्या बदलत्या संकल्पना आणि भूमिपुत्राची गेलेली रया इथे दृश्यमान होत जाते. बाप आणि मुलातली जनरेशन गॅप अस्वस्थ करायला लावणारी आहे. भूमिपुत्राला मिळालेले बदलते जागतिकीकरणाचे वास्तव त्याचे भावजीवन उद्ध्वस्त करणारे आहे. भूमी कुरतडणारी वाळवी आणि पीक फस्त करणारी टोळधाड यांच्या कचाट्यात तो सापडला आहे. बापाला हवी आहे गच्च पाय रोवण्यासाठी प्रदूषणरहित जमीन, तो शोधतोय या बदलत्या वास्तवात उडून गेलेला आपल्याच कातडीच्या आतला बाहेरचा रंग. या विद्रुप जगण्यावरची भूमीपुत्राची प्रतिक्रिया अतिशय बोलकी...

*तो म्हणतो मायघाल्या विठ्ठलानं / आतातरी जग बुडवायला हवं*
*इथल्या भूमिपुत्रांच्या कष्टाळू नितळ वीर्यासारखा / एड्स फ्री समुद्र आता नासू लागलाय*
*आयतं बसून खाणाऱ्यांच्या विष्ठेनं आणि मुत्रानं*

या नव्या रंगीत फॉर्म्युल्याची ही कहाणी, विद्रुप, भेसूर आणि कुरूप. नाचणाऱ्या मोरांची कहाणी अशीच. राजघाट, मोगल गार्डन, राजधानी दिल्ली, राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, कोपर्निकस मार्ग सर्वत्र नाचणारे मोर.

*इथं मोरांची हत्या होत नाही / म्हणून कायम मोर नाचताहेत*
*फक्त कापली जातात माणसं एकाएकी / कत्तलखान्यात गुरं कापावी तशी*
*तेव्हा मोर कुठं जात असतील?*

उजळमाथ्यानं जगतानाचं हे ढळढळीत सत्य मेरिटचे बदललेले निकष, आऊटडेटेड झालेत. त्याच्या पोटची पोर. एचआयव्हीनं ग्रासलेली. दिवसेंदिवस खंगत जाणारी. जाळत आयुष्य काढणारी. अम्लान सखूचं हे मलीन आयुष्य त्याच्या आयुष्याचा एक भाग बनतं.

*गल्लीबोळातून फिरायची गावाची करुणा / गावगप्पातून पांगायचा एचआयव्हीचा फेरा*

सखूचं जाणं आणि सरणापासून चंद्रापर्यंत धावणारा नुसता आंबट वारा. भूमिपुत्राच्या वाट्याला येणारं असलं अभद्र जीणं उजळमाथ्यानं मिरवण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय भूमिपुत्राच्या हाती नसतो. त्याच जगणं शेतीशी बांधलेलं. बाप आयसीयूत असताना शेती करणारा, वेड्यात जमा असणारा भाचा सव्वीस अकराच्या घटनेवरचे पेपर वाचतोय. शहिदांना अभिवादन करण्याच्या बातम्या दिसताहेत. त्याने विचारलेला प्रश्नही असाच कोड्यात टाकणारा-

*मामा शेती करणं म्हणजेच शहीद होणं नाही का? / आपल्या पिढ्यान्‌पिढ्या शेती करत शहीद झाल्या / आपल्याला कोणीच कसं अभिवादन केलं नाही?*

'शहीद' शब्दाच्या अर्थाची वलयं इथं विस्तारत जातात. जागतिकीकरणाच्या या काळात शेती करणं वेडेपणा ठरतोय. देशभरात बॉम्ब पेरल्याच्या खुणा गावशिवारापर्यंत वाहत येताहेत. उंदरांच्या टोळ्या पिकांच्या पिढ्या बरबाद करताहेत. उजळमाथ्यानं जगताही येत नाही, मरताही येत नाही, जगण्यातल्या घुसमटीचं अंत:सूत्र श्रीकांत देखमुखांच्या कवितेतून उभं राहताना वाचणाऱ्या वाचकांशी संवादी होत जातं. जगण्याची कोसळती लय आणि दर पिढीगणिक होत जाणारी वाताहत यांना या गोष्टीत आकार मिळतो.

या शेतकरी जगण्याशी नाळ बांधलेल्या श्रीकांत देशमुख यांचा अंत:स्वर व्यक्त होतो तो 'उजेडाचे मोर' या स्तबकात, शेतीतली कनवाळू माती आणि माथ्यावरचं वारकरी आभाळ सांभाळत आईच्या मायेच्या आठवणी इथे उमलत जातात. तनामनात रुजलेली झाडं, पाखरांची गर्दी, सुगरणीचा खोपा, जुनाट अरण्य, पाखरांचा किलबिलाट, धावता वारा, काळंसावळं आभाळ अशा एक ना अनेक गोष्टी इथे अवतरू लागतात. निसर्गाचं सजग भान या कवीकडे आहे.

*मी लावल्यानंतर माझ्या सोबत, गोष्ट होऊन फिरणारी झाडं आवडतात*
*कवितेचे होते झाड, की झाडाची होते कविता.*

देशमुखांच्या कवितेचे हे अनोखे रूप आहे. त्यांची आणि झाडांची खास मैत्री आहे. म्हणून ही झाडांची गोष्ट होऊन जाते. मुलांना वाढवावं तशी वाढवलेली ही झाडं आहेत. हे असे का झाले याचे उत्तरही श्रीकांत देशमुख यांनी दिले आहे.

*आईच्या गर्भातील वास्तव्यात / ती शेतात राबताना / पाखरांना जीव लावताना*
*माझ्यासोबत वाढलं असावं / एखाद्या दीर्घायुषी झाडाचं मूळ*

या झाडांशी एकरूप होताना देहावर सात्त्विक बियांची पेरणी व्हावी, देहाची हिरवीगार माती व्हावी अशी अपेक्षा ते करतात. शेतकरी जीवनातली निसर्गनाती आयुष्यभर जपणाऱ्या कवीच्या मनमुक्त जगण्याचे हुंकार व्यक्त करणारी ही गोष्ट आहे. निसर्गाचे हे अंत:सूत्र अंगभर लेवून ही कहाणी एका वेगळ्याच वाटेवर येऊन पोचते.

'बोलावे ते आम्ही' या दीर्घ कहाणीचा अखेरचा टप्पा 'नेणतं झाड'चा आहे. कवीच्या आस्थेच्या व्यक्ती इथे मूर्त होत जातात. आई-वडील, आजी-आजोबा, गयाबाई, अरुण गोविंद काळे, पांडुरंग सदाशिव साने हा कवीच्या आस्थेचा परीघ इथे विस्तारत जातो. नातेसंबंधाचे हे बोलणे आंतरिक जिव्हाळ्याचे तर आहेच पण त्यांच्यातल्या माणूसपणाचा शोध त्यातून पुढे येतो.

*गाईगुरांच्या दावणीतला ओलासुका चाराही / आता अनाथ झालेला*
*देव्हाऱ्यातल्या निराश्रित विठोबापाशी / गाईचा हंबर उंबरठा ओलांडून थांबलेला*

हे अस्सल अनुभवाचे बोल आहेत. व्यक्तिचित्रण करण्याची देशमुख यांची हातोटी विलक्षण प्रत्ययकारी आहे. अगदी तसाच व्याकूळ अनुभव आजीचाही आहे. गर्भाशय काढल्यानंतर वीस वर्ष आजी जगली. 'गर्भ काढला तर बाईमाणसात काय उरतं' हा आजीचा प्रश्न होता. कवीने रंगविलेली गयाबाईची व्यक्तिरेखा अधिक ठसठशीत आहे. गावगाड्यात राबणारी ही बाई कोणाची मायबहीण, मावशी, आत्या म्हणून मिरवत राहिली. रांडवपणाचे भोग भोगताना आयुष्याचा दुष्काळ अनुभवत राहिली.

*तुझ्या कपाळावरचा तांबडा सूर्य / उगवला नाही पुन्हा कधीच*
*पेरून टाकलंस तू कायमचं / उनगलेल्या कपाळावर / अबीरबुक्क्याचं एकेरी पीक*

आदिमायेची व्यक्तिरेखा आणि स्त्रीविषयीचं कवीचे चिंतन अधिक खोलवर जाणारे आहे. स्त्रीची अनंत रूपे इथे उलगडतात. कवितेच्या प्रगल्भतेची साक्ष इथे पटू लागते. लय पकडलेल्या या कवितेत अरुण गोविंद काळेसाठी, त्याच्या अंत्यसंस्कारासाठी आलेल्या कवीच्या भावनांची लय बिघडत जाते. वास्तव चिंतनाची पातळी उंचावू लागते. अरुणच्या आठवणी, त्याचे विचार आणि अंत्ययात्रेच्या वेळचे अस्वस्थ अनुभव यांची ही अभिव्यक्ती आहे. श्रीकांत देशमुखांची कविता इथे वैचारिकतेला कवेत घेते. अखेरचा प्रश्न तीरकामठ्यासारखा भेदून जाणारा...

***तुझ्या मातीला आलो अन् काय घेऊन चाललोय सोबत***
***हा कोणत्या दु:खाची अंधारअळी फिरतेय पापण्यांभोवती?***

श्रीकांत देशमुखांचे बोलणेही तसेच आहे. त्यांची कविता श्रोतृसंवादी आहे. म्हणूनच ती मनाला भिडते. शब्दांवरची हुकमत, चित्रदर्शी शैली, भूमीनिष्ठेचे प्रत्यंतर, शेती-माती-मळा-वावर-झाडे-पशुपक्षी या सर्वांचा हा कबिला आहे. ते बोलतात त्याची गोष्ट होते. चैतन्यदायी शब्दातून आशयाचा विस्तीर्ण पट या कवितेत उभा राहतो. माणूस, त्याचे जगणे, त्याचे अस्तित्व, त्याच्या पाऊल खुणा, त्याची सुखदुःखे, त्याचे नातेसंबंध या साऱ्यांनाच देशमुखांनी एकत्र बांधले आहे. वैचारिक अवकाशावर येऊन ही गोष्ट थांबते. ही अशी गोष्ट आहे की, तिला ना अंत ना पार.

**(२) शब्दालय प्रकाशन, प्रकाशित 'चक्रव्यूह' या कादंबरीची श्री. दिलीप चित्रे यांनी केलेली पाठराखण.**

रंगनाथ पठारे यांच्या कथनात्मक गद्यात 'चक्रव्यूह' ह्या कादंबरीला मी मध्यवर्ती स्थान देतो, ते ती खऱ्या अर्थाने प्रायोगिक आहे म्हणून; तसेच ती आपल्या संस्कृतीच्या सांप्रतच्या कोंडीत झालेल्या एका वैज्ञानिकाच्या शोकांतिकेची वैयक्तिक आणि सामूहिक व्यवहारांच्या संदर्भात मांडणी करते म्हणून.

या शोकांतिकेचा नायक सक्सेना हा परमाणू-विज्ञानात संशोधन करणारा आहे आणि त्याच्या ऊर्जेचा आविष्कार आणि लोपसुध्दा एखाद्या परमाणूच्या अस्तित्वासारखा भंगुर आहे. त्याच्या भोवतालचे स्थूल विश्व आपला समाज आणि त्यातल्या उपव्यवस्था आहेत. पण तो स्वतः व्यक्ती म्हणून एका क्वांटुम-विश्वाच्या अनिश्चिततेत भ्रमण करणारे रहस्यमय अस्तित्व आहे, हे रूपक ह्या कादंबरीचे संकल्पनात्मक मूळ आहे.

रंगनाथ पठारे यांनी 'चक्रव्यूह'नंतर अनेक वर्षांनी लिहिलेल्या 'नामुष्कीचे स्वगत' ह्या कादंबरीत हीच संकल्पना निराळ्या रूपात पुन्हा समर्थपणे अवतरते. 'चक्रव्यूह' आणि 'नामुष्कीचे स्वगत' यांचा एकत्र विचार केल्यास पठारे यांच्या कथनात्मक गद्याचे आधुनिकत्व, समकालीनत्व आणि प्रयोजकत्व ठळकपणे मनावर ठसते.

'चक्रव्यूह' ही मराठीतली एक यशस्वी 'नैतिक रहस्यकथा' आणि 'सांस्कृतिक शोकात्मिका' आहे, असेच मी म्हणेन.

**- दिलीप पुरुषोत्तम चित्रे**



**(३) दै. सकाळमध्ये 'पुस्तकांची ओळख' या सदरात प्रकाशित झालेली सन २००५ मधील नोंद.**

डॉ. अनुराधा शेवाळे या स्त्रीरोग आणि वंध्यत्वतज्ज्ञ म्हणून मराठवाड्यात सुपरिचित आहेत. वंध्यत्वनिवारण, कर्करोग निदान या विषयांवरती त्यांचे लेखन विविध नियतकालिकांतून प्रकाशित होत असते.

वैद्यकीय क्षेत्रातील निरनिराळ्या अनुभवांना शब्दबध्द करणाऱ्या 'नाळबंध' या पुस्तकानंतरचे डॉ. शेवाळे यांचे 'स्त्री-पुरुष वंध्यत्व : समस्या आणि समाधान' हे दुसरे पुस्तक. वंध्यत्व या समस्येचा वस्तुनिष्ठ वेध घेण्याची आणि त्यावरील अत्याधुनिक उपचार पध्दतीची परिपूर्ण माहिती देण्याची तळमळ प्रस्तुत पुस्तकाच्या लेखनामागे आहे.

डॉ. शेवाळे या गेल्या १७ वर्षांपासून स्त्रीरोग व वंध्यत्वतज्ज्ञ म्हणून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. वैद्यकीय सेवेच्या प्रदीर्घ अनुभवाच्या अर्कावरती 'स्त्री-पुरुष वंध्यत्व : समस्या आणि समाधान' या पुस्तकाची निर्मिती झाल्यामुळे आयुष्यातील बेरजेचे गणित कमीत कमी समीकरणात कसे सोडवायचे याची गुरुकिल्ली हे पुस्तक वाचकांच्या हाती देते आणि निपुत्रिकपणाचे दुःख दूर पळवायला मदत करते. या पुस्तकामध्ये १२ प्रकरणे असून विविध उदाहरणांद्वारे विषय सोपा करून फुलवत फुलवत नेला आहे.

आजच्या संगणक युगातही वंध्य जोडप्यांना पुरेसा वैद्यकीय सल्ला मिळत नाही, बुवाबाजी, मंत्र-तंत्र, जादू, अंगारे-धुपारे यासारख्या अंधश्रध्दांच्या विळख्यात मग अशी जोडपी अलगद सापडतात, अशा जोडप्यांना मार्गदर्शक असे हे पुस्तक आहे. याशिवाय वंध्यत्वाच्या समस्येविषयी ज्यांना ज्यांना आस्था आहे अशांसाठी मित्र म्हणून हे पुस्तक उपयोगी आहे, तर लैंगिक शिक्षणाला पूरक सामग्री पुरवणारे पुस्तक म्हणूनही या पुस्तकाचा उल्लेख करता येईल.

स्त्री-पुरुष वंध्यत्व : समस्या आणि समाधान
डॉ. अनुराधा शेवाळे
मराठवाडा मेडिकल फाउंडेशन ट्रस्ट, नांदेड.
पृष्ठे-६४, जनहितार्थ, विनामूल्य.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१) प्र.न. जोशी - आदर्श मराठी शब्दकोश, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे आवृत्ती सातवी-२००७ (पृ.२६१)
२) उ.नि.- आदर्श मराठी शब्दकोश- (पृ.७५३)
३) उ.नि.- आदर्श मराठी शब्दकोश- (पृ.६८७)
४) उ.नि.- आदर्श मराठी शब्दकोश- (पृ.६१)
५) कुलकर्णी गो. म. - (रसग्रहण : कला व स्वरूप- पृ.१०८)
६) अ. वा. कुलकर्णी- साहित्यविचार, प्रतिमा प्रकाशन पुणे. आवृत्ती -दुसरी, १९९७, (पृ.११२)
७) उ.नि.- (पृ.११३)
८) उ.नि.- (पृ.११४)
९) उ.नि.- (पृ.११७)
१०) उ.नि.- आदर्श मराठी शब्दकोश (पृ.४३)
११) उ.नि.- (पृ.९८१)
१२) उ.नि.- (पृ.९४६)
१३) वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश - संपा. प्रभा गणोरकर व इतर : ग.रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई, आवृत्ती - पुनर्मुद्रण २०१३ (पृ.क्र.३४९)
१४) उ.नि.- आदर्श मराठी शब्दकोश (पृ.१०८७)
१५) उ.नि.- आदर्श मराठी शब्दकोश (पृ.क्र. ११२४)
१६) उ.नि.- उ.नि. - आदर्श मराठी शब्दकोश (पृ.१८९)
१७) वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश (पृ.३४८)
१८) व्यावहारिक मराठी, ल.रा. नसिराबादकर - फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती सातवी - २००४ (पृ.८३)
१९) उ.नि.- व्यावहारिक मराठी (पृ.८७)